पुढारी
My मुंबई
रविवार १६ ऑगस्ट २००९



लिव इन रिलेशनशिपचा गैरफायदा घेऊ नये

# अस्वस्थ युवकांचे आशास्थान : निर्माण

❖ अथांग सावंत

## सामाजिक बांधिलकीचा स्पृहनीय अविष्कार

'स्वत:साठी जगला तो मेला, दुसऱ्यासाठी जगला तो जगला, हे आयुष्याचे तत्वज्ञान काही जण केवळ वाचत बसत नाहीत तर ते सत्यात उतरविण्यासाठी प्रयत्न करतात. प्रयत्न करतात म्हणण्यापेक्षा दुसऱ्यांसाठी जगतात. शिक्षण पूर्ण केल्यानंतर समाजाचं काहीतरी देणं लागतो, ही जाणीव फारच कमी जणांना असते. अन्यथा शिक्षण घेऊन रॅटरेसमध्ये धावण्यातच आपले आयुष्य संपवून टाकतात. अर्थपूर्ण आयुष्य कसं जगता येईल, मी माझ्या कौशल्यांचा, क्षमतांचा उपयोग समाजासाठी कसा करू शकतो, असे अनेक प्रश्न अनेकांना पडतात. अशा अस्वस्थ युवकांसाठी निर्माण या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून ज्येष्ठ समाजसेवक महाराष्ट्रभूषण डॉ. अभय बंग आणि राणी बंग यांनी आवाहन केले आहे.

रॅटरेसमध्ये न धावता थोडा वेगळा विचार करून समाजसेवेसाठी राज्यात अडीचशेच्यावर मुले-मुली निर्माणमध्ये एकत्र आली आहेत. सामाजिक जाणीव मनात ठेवून जून २००६ पासून निर्माण शिबिराची मालिका सुरू झाली आहे. नुकत्याच झालेल्या निर्माण शिबीर एक ते दोनमध्ये जवळपास दीडशे युवक-युवतींनी भाग घेतला होता. महात्मा गांधीजींच्या नई तालीम शिक्षण पद्धतीवर आधारित 'अनुभवाद्वारे शिक्षण' निर्माणमध्ये दिले जाते. माझ्या अवतीभोवती कोणते प्रश्न आहेत, याचा प्रत्यक्ष अनुभवाद्वारे शोध घेतला जातो.

लोकांमध्ये जा, त्यांच्यात राहा आणि प्रश्न शोधा अशी ही



शिक्षणप्रक्रिया आहे. निर्माणमध्ये चार शिबिरांची एक बॅच असते. पहिल्या शिबिरात मी, माझं मन आणि शरीर याविषयी माहिती दिली जाते. दुसऱ्या शिबिरात समाज व सृष्टीशी असलेले माझे नाते व जबाबदारी याविषयी जाण निर्माण करून दिली जाते. तिसऱ्या शिबिरात अनुभवावर आधारित केवळ प्रश्न काढले जात नाहीत, तर प्रत्यक्ष खेड्यात जाऊन अनुभवले जातात. मनाला भिडलेल्या प्रश्नांचं पुढे काय याचे भान चौथ्या शिबिरात करून दिले जाते.

निर्माणचा उद्देश खूप सोपा आहे. एखाद्याने अॅग्रिकल्चर केले असेल तर त्याने घेतलेले शिक्षण त्याच्या गावासाठी, शहरांसाठी उपयोगी यावं, त्याच्या गावच्या जमिनीची शेती सुधारावी, जमिनीचा कस वाढवावा या गोष्टींसाठीही उपयोगात आली पाहिजे. गावाप्रमाणेच ही बाब देशपातळीवरही लागू होते.

प्रत्येकाने आपली सोसायटी, गाव समृद्ध करण्यावर भर द्यावा त्याचा थेट परिणाम देशाच्या विकासावर होईल. ही भूमिका समजावून सांगण्यासाठी बंग दाम्पत्य निर्माणची शिबिरे होत असतात. महाराष्ट्रातील युवकांना सामाजिक समस्यांविषयी सजग करावं आणि त्यातून परिवर्तन घडवणारं नेतृत्व तयार व्हावं या उद्देशाने निर्माण हा उपक्रम जून २००६ मध्ये सुरू झाला.

निर्माण शिबिराची तिसरी बॅच जानेवारी २०१० पासून सुरू होत आहे. त्यासाठी अर्ज भरण्याची शेवटची तारीख ३१ ऑगस्ट आहे. मिळालेल्या अर्जातून मुलाखतीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी २० सप्टेंबरपर्यंत जाहीर केली जाईल. मुलाखती २५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर या कालावधीत महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी घेतल्या जातील.

तरी या अॅक्टिव्हिटीमध्ये जास्तीत जास्त तरुणांनी सहभाग घ्यावा, असेही आवाहन निर्माण शिबिराच्या वतीने करण्यात आले आहे. यासाठी सचिन तिवले (९४२१४५६१४४), दीपा देशमुख (९४२३७०४१११) आणि उमेश खाडे (९८९२६४९६६४) यांच्याशी संपर्क साधता येईल. तसेच निवड प्रक्रियेचा अर्ज मिळवण्यासाठी http://nirman.mkcl.org/downloads.htm या वेबसाइटवर लॉग इन व्हा.